**आकर्षक लग्न पत्रिका**
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
**श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्**
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६७ ■ अंक क्र.१७८ ■ बुधवार ३ एप्रिल २०२४ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26



**ना नफा! ना तोटा!**
**पशुखाद्य**

गौ माता भोजन ५ कि. गुळ पावडर बॅग
**200/- रुपये मात्र**
हळद २८० रू. किलो, खोबरे १४० रू. किलो
**सागर ड्रायफ्रुट**
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००/९६८९०४३५५१)


## ईडीने हरकत न घेतल्यामुळे आप नेते संजय सिंह यांना जामीन मंजूर; केजरीवालांसह तिघे तुंगारातच

**नवी दिल्ली, दि.२– आम आदमी पक्षाचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय सिंह यांना ऑक्टोबर २०२३ मध्ये मनी लाँडरिंग प्रकरणी ईडीने अटक केली होती. हे प्रकरण दिल्लीतील मागे घेतलेल्या अबकारी धोरणाशी संबंधित होते. ईडीने संजय सिंह यांच्या जामीनाला विरोध केला नाही, त्यामुळे न्यायालयाने सिंह यांचा जामीन मंजूर केला. दरम्यान, याप्रकरणात सुप्रीम कोर्टाने ईडीच्या अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केल्याचे सांगितले जात आहे.**

संजय सिंह यांच्या व्यतिरिक्त आपचे तीन नेते तिहार तुरुंगात आहेत. माजी मंत्री सत्येंद्र जैन, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे सध्या तिहार तुरुंगात आहेत. तर यापुढे आणखी चार आप नेत्यांना ईडीकडून अटक करण्यात येणार आहे, अशी प्रतिक्रिया आपच्या नेत्या आतिशी यांनी आजच पत्रकार परिषदेद्वारे दिली. ४ ऑक्टोबर रोजी संजय सिंह यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. १० तास चौकशी केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आले. दिल्लीत नव्या अबकारी धोरणाची अंमलबजावणी करण्यात संजय सिंह यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ज्यामुळे काही मद्य उत्पादक, घाऊक व्यापारी आणि किरकोळ विक्रेत्यांना नफा झाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता.

आज सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान ईडीने पीएमएलए कायद्याच्या कलम ३ आणि ४ अंतर्गत चौकशी सुरू असताना संजय सिंह यांना जामीन देण्यास हरकत नसावी, असे सांगितले. जामीनाच्या अटी काय असाव्यात? हे सत्र न्यायालयात ठरविण्यात येणार आहे. आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीस संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने ज्यामध्ये न्या.दिपांकर दत्ता आणि पीबी वराळे यांचाही समावेश होता. जामीन मिळाल्यानंतर संजय सिंह राजकीय कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात, असेही न्यायालयाने (पान ४ वर)

## भरधाव ट्रकची ट्रॅक्टरला धडक, चौघे मजूर ठार

रत्नागिरी, दि.२– नागपूर महामार्गावर सांगली जिल्ह्यातील आगळगाव फाटा येथे भीषण अपघात झाला आहे. ट्रॅक्टरला भरधाव येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात चारजण ठार झाले आहेत, तर आठ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन महिला, एक पुरुष आणि एक लहान मुलीचा समावेश आहे. जखमी यांच्यावर मिरजेच्या शासकीय रुणालयात उपचार सुरू आहेत. ऊसतोडी संपवून ऊसतोड मजूर ट्रॅक्टरमधून परत मंगळवेढ्याकडे निघाले होते. कवठेमहांकाळ तालुक्यातील आगळगाव फाटा येथे भरधाव येणाऱ्या ट्रकने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चारजण ठार झाले तर आठ जण गंभीर जखमी झाले.

## दत्तात्रय शिंदेंकडे आढळली सोन्याची बिस्किटे तिघा संशयितांना दोन दिवसांची पो.कोठडी



**धुळे, दि.२– एलसीबीचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे व लाच स्वीकारणारे दोघा पोलीस कर्मचाऱ्यांना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. पोलिसांनी घेतलेल्या घरझडतीमध्ये साठ लाखांचे सोने, सत्त्याहत्तर हजारांची चांदी व एक कोटी पंच्याहत्तर लाखांची मालमत्ता खरेदीचे दस्त दत्तात्रय शिंदेंच्या घरातून मिळून आले आहेत. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक श्रीमती रुपाली खांडवी यांनी लॉकर्स, मालमत्ता खरेदी दस्त, आवाजाचे नमुने** (पान ४ वर)

### दत्तात्रय शिंदेचे भागीदार कोण?

दत्तात्रय शिंदे यांच्या घर झडतीमध्ये काही जमिनींच्या व्यवहाराचे दस्त तसेच भागीदारीत जमिनी खरेदीचे दस्त मिळून आल्याचे सांगण्यात येते. माजी पो.अधीक्षक संजय बारकुंड यांच्या काळात धुळे शहरात जमिनींचे बरेच व्यवहार घडले. यामुळे या सगळ्या प्रकरणात भागीदारीचे व्यवहार कोणत्या जागेचे व कोणाबरोबर झाले? याची सारासार माहिती पुढे येणे आवश्यक झाले आहे. यातील काही जण ही केस कशी मिटवता येईल यासाठी वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्नशील होते, असे वृत्त आहे.



## बोराडी फाट्यावर स्पिरीट जप्त राज्य उत्पादनची धडक कारवाई

**शिरपूर, दि.२ (का.प्र.)– तालुक्यातील सांगवी–बोराडी रस्त्यावर स्पिरीटची वाहतूक करणारा पिकअप राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला. ही कारवाई एक एप्रिलला दुपारी करण्यात आली. एका संशयिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.**

स्पिरीटची अवैध वाहतूक सुरु असल्याची माहिती मिळाल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी.पी.नेहुल यांनी सहकाऱ्यांसह सांगवी ते बोराडी दरम्यानच्या रस्त्यावर सापळा रचला होता. संशयित पिकअप (एमएच ४८, टी ८१३३) येतांना दिसताच पथकाने थांबण्याा इशारा केला. बोराडी फाट्याजवळ वाहन थांबवण्यात पथकाला यश मिळाले. वाहनाच्या झडतीत दोन हजार १०० लिटर स्पिरीट ड्रममध्ये भरलेले आढळले. स्पिरीटची अवैध वाहतूक केल्याच्या संशयावरुन चालक रामेश्वर तथा पप्पू कैलास गायकवाड (रा.सांगवी ता.शिरपूर) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. निरीक्षक देविदास नेहूल, दुय्यम निरीक्षक ए.सी. मानकर, बी.एस. चौथवे, सहायक दुय्यम निरिक्षक ए.बी. निकुंभ, जवान केतन जाधव, गोरख पाटील, प्रशांत बोरसे, रविंद्र देसले यांनी ही कारवाई केली.

## जिल्ह्यात टंचाई निवारणासाठी नियंत्रण कक्ष स्थापन : जिल्हाधिकारी

**धुळे, दि.२– धुळे जिल्ह्यात टंचाई निवारणासाठी नियंत्रण कक्ष स्थापन केला असून नागरीकांना टंचाईबाबत समस्या असल्यास ०२५६२–२८८०६६ या क्रमांकावर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी पत्रकान्वये केले आहे.**

जिल्हाधिकारी गोयल यांनी पत्रकात म्हटले आहे की, धुळे जिल्ह्यात सन २०२३ च्या पावसाळ्यात एकूण ४३३.७ मि.मी. म्हणजे वार्षिक सरासरीच्या ८१.०५ टक्के इतका पाऊस झाला आहे. आज रोजी धुळे जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये १२२.३९ दलघमी (२५.१६ टक्के) पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्यावर्षी आजच्या दिवशी १९८.८१ दलघमी (४०.८६ टक्के) इतका पाणीसाठा शिल्लक होता. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासाठी आजअखेर ८५ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून शिंदखेडा तालुक्यातील मौजे डाबली, धावडे, रहिमपुरे व धुळे तालुक्यातील मौजे तिसगाव, वडेल येथे एकूण ५ शासकीय टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

सन २०२३ मध्ये धुळे जिल्ह्यात अत्यंत कमी पर्जन्यमान झाल्यामुळे ३१ ऑक्टोंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये संपुर्ण शिंदखेडा तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील धुळे, साक्री, शिरपूर या तीन तालुक्यातील एकूण २८ महसूल मंडळात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेली आहे. सदर दुष्काळी परिस्थितीचे अनुषंगाने तसेच पाणी टंचाई उपाययोजना करणेसाठी जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पातील पिण्यासाठी आरक्षित असलेल्या पाण्याचे आवर्तन सोडणेकामी जिल्हाधिकारी श्री. गोयल यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २९ मार्च व १ एप्रिल, २०२४ रोजी सर्व जिल्हस्तरीय संबंधित विभागांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील पाणी टंचाई निवारणासाठी अक्कलपाडा मध्यम प्रकल्पातून ५ एप्रिल, २०२४ रोजी २५०.०० दलघफु पाण्याचे आवर्तन सोडणेबाबत निर्देश दिले आहेत. तसेच सद्यस्थितीत ज्या धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षीत असेल व सदर आरक्षीत पाण्यामधून अवैधरित्या पाण्याचा उपसा थांबवून संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार, उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, पाटबंधारे विभागातील अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत (पान ४ वर)



## बनावट मतदान कार्ड बनविणाऱ्या दोघांना अटक; मुद्देमाल जप्त

**धुळे, दि.२– भारत निवडणूक आयोगाचे बनावट मतदान कार्ड तयार करणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. शहरातील गायकवाड चौकात ही कारवाई करण्यात आली.**

पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार विनोद नामदेव गरुड रा.गायकवाड चौक धुळे हा भटाई माता रिक्षा स्टॉप जवळील सुर्योदय फोटो स्टुडीओचे चालक सुर्यकांत कोकणी याचे मदतीने स्वत:च्या आर्थीक फायद्यासाठी लोकांकडून पैसे घेऊन त्यांचे आधारकार्ड वरुन संगणकाच्या आधारे रॅण्डमली मतदार नंबर टाकून आगामी लोकसभा निवडणुक–२०२४ च्या अनुषंगाने बनावट मतदान कार्ड तयार करुन शासनाची फसवणुक करित होता. त्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोहाडी उपनगर भटाई माता रिक्षा स्टॉप जवळ असलेल्या सुर्योदय फोटो स्टुडीओ येथे छापा टाकला असता त्यांच्या फोटो स्टुडीओ मध्ये लोकांचे बनावट मतदान कार्ड तसेच मतदान कार्ड तयार करण्यासाठी लागणारा फोटो पेपर, ज्या संगणकावर मतदान कार्ड तयार (पान ४ वर)

## नवापूरला अठरा लाखांचा अवैध दारुसाठा जप्त निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एलसीबीची कारवाई

**नवापूर, दि.२ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी आगामी लोकसभा निवडणूक व सण उत्सावाचे अनुषंगाने जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर अवैधपणे दारुची वाहतूक होणार नाही तसेच अवैध दारुची तस्करी करणाऱ्यांची माहिती काढून त्यांचेवर कठोर कारवाई करणेबाबत पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्यांना निर्देश दिले होते. या अनुषंगाने पोलिसांनी एका ट्रकसह सुमारे अठरा लाखांचा अवैध**



**दारुचा साठा जप्त केला असून पाच ते सहा जणांना अटक केली आहे.**

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार महाराष्ट्रातून नवापूर मार्गे गुजरात राज्यात अवैधरित्या देशी विदेशी दारु चोरटी वाहतूक करुन विक्रीसाठी जाणार असलेबाबत माहीती मिळाली. त्यावरून पोलीस अधीक्षक यांनी सदर माहितीचे आधारे स्थानिक गुन्हे शाखा व नवापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी यांना माहिती दिली व त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे व नवापूर पोलीस ठाण्याचे एकपथक तयार करुन तात्काळ रवाना केले. नवापूर तालुक्यातील (पान ४ वर)

## कुसुंब्यात आज दिक्षा कल्याणक महोत्सव

कुसुंबा, दि.२ (प्रतिनिधी)– जैन धर्मियांचे तीर्थंकरापैकी प्रथम तीर्थंकर भगवान आदिनाथ अर्थात वृषभदेव यांचा येत्या ३ एप्रिल बुधवार रोजी (चैत्रकृष्ण नवमी) जन्मकल्याणक आणि दिक्षा कल्याणक महोत्सव दिनानिमित्त सर्वत्र समाज बांधव मोठ्या उत्साहात मंगलमय वातावरणात हा दिवस साजरा होत असल्याची माहिती खान्देश जैन समाजाचे प्रसिध्दी प्रमुख सतीश वसंतीलाल जैन व मयुर रिखब जैन यांनी दिली. महोत्सवानिमित्त महाअभिषेक, भगवान आदिनाथ पुजा पाठ आदि धार्मिक कार्यक्रमाने हा उत्सव साजरा केला जाणार आहे. वृषभ देवांचे जीवन चरित्र केवळ जैन साहित्या (पान ४ वर)

## गरताड येथे शेतकऱ्याचे घर फोडले चोरांकडून दागिन्यांसह रोकड लंपास

**धुळे, दि.२– तालुक्यातील गरताड येथील एका शेतकऱ्याच्या घरात धाडसी चोरीची घटना घडली. चोरट्यांनी दोन तोळे सोन्यासह २० हजार रूपयांची रोकड लंपास केली. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.**

याबाबत वृत्त असे की, धुळे तालुक्यातील गरताड येथे आज सकाळी सात वाजेच्या सुमारास शेतकरी नंदलाल वामन पाटील हे आपल्या परिवारासहित घराला कुलूप लावून धाब्यावर झोपले असतांना अज्ञात चोरट्यांनी घराचे कडी कोंडा तोडून घरातील कपाट उचलून थेट नरव्हाळ गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर ३०० ते ४०० मीटर उचलून नेले व त्या ठिकाणी कपाट तोडून कपाटातून २० हजार रुपये रोकड, त्याचबरोबर २ तोळे सोने ज्यात प्रामुख्याने कानातले गळ्यातले असे एकूण दोन तोळे सोनेसह दहा ग्रॅम चांदी असा ऐवज लंपास केला. तेथून चोरटे पसार झाले. सदर घटनेची माहिती मिळताच मोहाडी पोलीस ठाण्याचे पोलीस पथक त्याचबरोबर यावेळेस श्वान पथक, ठसे तज्ञांना पाचारण करण्यात आले होते. पो.हेडकॉन्स्टेबल अतुल पाटील, (पान ४ वर)



## स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

**शहादा, दि.२ (का.प्र.)– शहादा नगरपालिका हद्दीतील नवीन वसाहतींसह जुन्या गावात ठिकठिकाणी सांडपाणी साचल्याने डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती होत असून पालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.**

याबाबत अधिक वृत्त असे, शहादा नगरपालिकेमार्फत आरोग्य व स्वच्छता विभागातर्फे दैनंदिन साफसफाईसाठी खाजगी कंपनीस ठेका देण्यात आला आहे. तसेच शहरातील विविध भागातील साफसफाई करण्यासाठी आरोग्य कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मात्र संबंधित विभागात प्रमुख अधिकारी नसल्यामुळे व आरोग्य विभागातील संबंधित प्रभारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुर्लक्षामुळे ठिकठिकाणी कचरा साचला आहे.याशिवाय सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लागत नसल्याने अनेक भागात सांडपाणी साचून दलदल निर्माण झाली आहे. विविध भागातील मोकळ्या जागेतील साचलेल्या सांडपाण्यावर डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत आहे. शहादा शहरातील नवीन वसाहतींसह जुन्या भागात सायंकाळच्या वेळेस डासांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येत आहे. विविध भागातील रहिवाशांना डासांमुळे शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. परिणामी आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाला असून हिवतापाचे रुग्णातही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, खाजगी ठेकेदार दैनंदिन साफसफाई करण्याऐवजी आठवड्यातून कधीतरी साफसफाई करत असून कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटा गाड्या या सुद्धा नियमित येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. पालिकेच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागातील प्रभारी अधिकारी व कर्मचारी यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला (पान ४ वर)

## मतदार ओळखपत्राचे पोस्ट कार्यालय मार्फतच वितरण : जिल्हाधिकारी

**धुळे, दि.२– मतदाराने मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करणे, तसेच मतदार यादीमधील नाव, पत्ता, जन्मदिनांक इत्यादी दुरुस्तीसाठी फार्म नंबर ६ व ८ भरुन दिल्यानंतर फॉर्म स्विकृतीनंतर संबंधित मतदाराचे मतदार ओळखपत्र पोस्ट कार्यालयामार्फतच मोफत घरपोच वितरीत करण्यात येते. इतर कोणत्याही प्रकारे मतदार ओळखपत्रांचे वाटप होत नसल्याने मतदारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी एका पत्रकान्वये केले आहे.**

जिल्हाधिकारी गोयल यांनी पत्रकात म्हटले आहे की, भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार ०२–धुळे लोकसभा मतदारसंघाची मतदान प्रक्रिया पाचव्या टप्प्यात होणार असून २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदार ओळखपत्र (ईपीक) हा मतदाराची ओळख पटविण्याचा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. मतदाराने मतदार यादीमध्ये नाव समाविष्ठ करणे, तसेच मतदारयादीमधील नाव, पत्ता, जन्मदिनांक इत्यादी दुरुस्तीसाठी फार्म नंबर ६ व ८ भरुन दिल्यानंतर फॉर्म स्विकृती झाल्यानंतर संबंधित मतदाराचे मतदार ओळखपत्र पोस्ट कार्यालयामार्फत मोफत घरपोच पाठविण्यात येते.

काही कारणास्तव मतदारास मतदार ओळखपत्र (ईपीक) प्राप्त न झाल्यास त्याने संबंधित पोस्ट ऑफीस व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयास संपर्क साधणे आवश्यक आहे. मतदार ओळखपत्र हे फक्त पोस्ट ऑफीस, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार यांच्या कार्यालयामार्फतच मतदारांना वितरीत करण्यात येते. इतर कोणत्याही प्रकारे मतदार ओळखपत्र (ईपीक) चे वाटप होत नसल्याने मतदारांनी कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, असेही जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी कळविले आहे.



## पावणेदोन लाखांची रोकड लांबविणाऱ्या दोघांना अटक

**धुळे, दि.२– नाशिकहून धुळ्याकडे कारने येत असतांना मुंबईतील इसमाची सुमारे १ लाख ७० हजार रुपयांची रोकड लांबविणाऱ्या दोघांना मुद्देमालासह अटक करण्यात तालुका पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे अवध्या पाच ते सहा तासातच हा गुन्हा उघडकीस आला आहे.**

याबाबतची माहिती अशी की, मुंबई येथील रहिवासी ईश्वरलाल अभिमन सोनवणे (३९) हे दि.१ एप्रिल रोजी कल्याण येथून सोबत एक लाख ७० हजार रुपयांची रोकड घेवून नाशिक येथे आले. येथे राहणाऱ्या गौतम पगारे यास त्यांनी रोकडबाबत माहिती देवून आपल्याला धुळे येथे जाण्यासाठी वाहन उलपब्ध करुन देण्याची विनंती केली. पगारे याने तात्काळ एमएच ०२ सीडब्ल्यू ९६१२ ही पांढऱ्या रंगाची कार बोलावून घेतली. यानंतर सदर कारमधून सोनवणे, पगारे व चालक असे तिघे धुळ्याकडे निघाले. सदर कार धुळ्याजवळील वार–कुंडाणे फाट्यालगत आली असता पगारे याने सोनवणेंना वाहनाखाली उतरवून टायर्सची हवा तपासण्यास सांगितले. ही संधी साधून पगारे हा चालकासोबत रोकड असलेली पिशवी घेवून कारसह फरार झाला. याबाबत सोनवणे यांनी (पान ४ वर)

## सर्वधर्म संघाचे कविसंमेलन उत्साहात संपन्न वृद्धाश्रमाच्या प्रथेवर कवितांमधून आसूड

**धुळे, दि.२– सर्वधर्म संघ धुळेच्या वतीने २१ मार्च हा विश्व कविता दिना निमित्त मन–मानव जागृती अभियानांतर्गत मोजक्या व दर्जेदार निमंत्रित कविंचे वृध्दाश्रम या विषयावर कविसंमेलन पार पडले. सर्वधर्म संघाचे सचिव प्रा.राम जाधव यांनी सुत्रसंचन केले व प्रास्ताविक मांडले.**

भारतीय संस्कृतीच्या माथ्यावर पहिला कलंक जेमतेम ७० वर्षापुर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या मार्गाने सनदशीरपणे पुसला. मात्र आता पुन्हा दुसरा गडद होत जाणारा कलंक म्हणजे वृध्दाश्रम प्रथा. ही आपल्या देशाची निर्मित संस्था नाही व संस्कृतीचा भाग नाही जो खरोखरच आपल्या संस्कारीत संस्कृतीवरचा वाढत जाणारा कलंक आहे आणि अशा प्रकारे साहित्यिकच आपल्या कवितेच्या माध्यमातून समाजाचे लक्ष त्या त्या अनिष्ट रुढी प्रथांकडे वळवत असतात असे प्रा.जाधव म्हणाले.

प्रबोधनात्मक कवितांचे लिखान करणाऱ्या निवडक आमंत्रित कविंचे कविसंमेलन राजवाडे संशोधन मंडळा समोरील सेंट अँथोनी कथोलिक चर्चच्या परिसरात यशस्वीपणे दोन सत्रात पार पडले. त्यात पहिल्या सत्राचे अध्यक्ष प्रसिध्द विडंबन कवि डॉ.रमेश जैन हे होते. आपल्या अस्सल विडंबन शैलीतील दोन काव्य रचना सादर करुन कविसंमेलनात रंग भरला.दुसऱ्या सत्राचे अध्यक्षरविंद्र पानपाटिल हे होते. त्यांनी वृध्दांचा प्रत्येक घरात आदर राहायला पूरक संस्कार प्रत्यक्षात समाजात साहित्यिकच रुजवु शकतात व असे सामर्थ एक कवितेत असल्याचे प्रतिपादन केले.

व्यासपीठावर क.ऊ.संघवी हे प्रमुख अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष विराजमान होते. डॉ. श्रीकृष्ण बेडसे यांनी मनोगत व्यक्त केले. या कवि संमेलनाला साहित्यिक गुलाबराव मोरे, कवी मुरलीधर पांडे, कवी चंद्रशेखर कासार, छोटुलाल मोरे, डी.बी. दलाल, तिरुपती सोनवणे, मंगेश जाधव, मोतिलाल (पान ४ वर)

## आठ नक्षलवादी ठार

गडचिरोली, दि.२– गडचिरोली जिल्ह्यातील कोरचोली भागात नक्षलवादी आणि सुरक्षा दलामध्ये झालेल्या चकमकीत आठ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षलवादी मोठा घातपात करण्याची शक्यता वर्तवली जात होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली आहे. मंगळवारी सकाळी सहा वाजेपासून नक्षलवाद्यांसोबत जवानांची चकमक सुरू होती.


**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -63,450 रु.+3% GST
सोने- 24 K -69,000 रु.+3% GST
चांदी- 77,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३



डॉ.अरुण साळुंके–नेत्रतज्ञ यांचा डोळ्यांचा
**दवाखाना व हॉस्पिटल पुर्ववत सुरु**
आज ता.२/४/२०२४ मंगळवार पासून डॉ.अरुण साळुंके नेत्रतज्ञ यांचे डोळ्यांचा दवाखाना पूर्ववत सुरु होत आहे. (डॉक्टरांच्या हाताला फ्रॅक्चर झाले होते म्हणून दवाखाना बंद होता) दवाखाना वेळ : फक्त सकाळी ११ ते १ पर्यंत
**डॉ.अरुण साळुंके**, ग.नं.५, धुळे

# आपला महाराष्ट्र

## निवडणुकीतील संभ्रमावस्था आणि निरुत्साह

केंद्रातील सत्तेतील पक्षाने चारशे पारचा नारा दिला खरा पण त्यांच्या खेम्यात निरुत्साह दिसून येत आहे. महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षात चलबिचल प्रचंड आहे. प्रत्येक मतदारसंघातून अधिकृत उमेदवारा विरूध्द प्रतिकुल प्रतिक्रिया येत आहेत. मराठी टिव्ही चॅनेल्सवर ज्या बातम्या येतात त्यांचा टाईपच वेगळा आहे. तो असा त्याच्या बाबत म्हणाला आणि हा तसा याच्या बाबत म्हणाला अशाच प्रतिक्रियावादी बातम्या धडकतात. ज्यात समर्थक सोडले तर कुणालाच रस नाही. वृत्तपत्रातील बातम्या विश्लेषणात्मक येतात मात्र त्यात फुटीरांना गृहीत धरून अमुक तमुक मतदारसंघातील समीकरणे बदलणार आहेत असे सांगितले जाते. म्हणजे फुटलेल्यांचे वजन खूप आहे आणि ते कुठेही गेले तरी आम्ही त्यांच्याच सोबत आहोत असा लोकांचा होरा असल्याचे त्या विश्लेषणात म्हटलेले असते. एकार्थाने नैतिकता धाब्यावर बसवून अवसरवादी भूमिका घेणारेच त्या त्या मतदार संघात लोकप्रिय आहेत असे भासवले जाते. परंतु दीर्घकाळ राजकारणात वहिवाट असलेल्या नेत्यांना घरी बसवून नवे लोक निवडून जाऊ शकतात असे निर्णय मतदार घेऊ शकतात. ही बाब विश्लेषक नजरेआड करतात. आणिबाणी नंतर श्रीमती इंदिरा गांधींनी नवा इंदिरा काँग्रेस पक्ष काढला तेव्हा सर्वत्र नवे उमेदवार उभे केले होते. या संदर्भात एक उदाहरण पुरेसे आहे. साक्री विधानसभा मतदार संघातून सुक्राम मालुसरे निवडून आले होते. त्यांना तमाशा फडातून उचलून तिकिट दिले होते. अशी असंख्य उदाहरणे आहेत. त्यामुळे आज जे फुटून निघाले आणि पक्षांतर केले त्यांना अती महत्व देण्याचे काम होत आहे. शिवाय ज्यांनी ज्यांनी पक्षांतर केले ते सगळे काँग्रेस कडून आलेले आहेत. इतर पक्षांकडून ही आलेले आहेत. सत्ताधारी पक्षातील ओरिजनल कोणीही नाही म्हणून जो गोंधळ चालू आहे त्यास ते स्वत:च कारणीभूत आहेत. शिवाय जे पक्षफोडून त्यांच्याशी मूळ पक्षाने सलगी केली त्यांचे गट म्हणून ओळख आहे पक्ष म्हणून नाही. त्यामुळे त्यांच्या व्यक्तीगत प्रभावाच्या भांडवलावर ते निवडून येण्याची शक्यता कमी असल्याची जाणीव त्यांनाही झाली आहे. म्हणून निरुत्साह अधिक आहे. महाराष्ट्रातील राजकारण पुरते गढूळ झालेले असल्याने लोकांचा भ्रम निरास झाला आहे. परिणामी लोकांमध्ये नेहमीचा उत्साह नाही. मतदान देखील कमीत कमी होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने पाच टप्प्यात निवडणूक घेण्याची घोषणा केली तो मुद्दा देखील नकारात्मकता निर्माण करणारा आहे. वास्तविक इतके टप्पे करण्याची काहीच गरज नव्हती. महाराष्ट्रातील राजकीय झमेले आणि लोकांचा कौल आपल्याला मिळेल की नाही याबाबत साशंकता असल्याने अशा पध्दतीचा लांबचा कार्यक्रम लावण्यात आला असल्याचे आरोप जाणकार लोक उघड उघड करीत आहेत. परवा जळगावहून एकनाथ खडसे तातडीने दिल्लीला गेले तेव्हा सोशल मीडियावरच्या बोरू बहाद्दरांनी व काही वृत्तपत्रांनी ते दिल्लीला गेल्याने भाजपात परतणार अशा बातम्या मॅनेज केल्या. तसा प्रचार अनेक दिवसांपासून सुरू आहे. नंतर लगेचच दुसरी बातमी आली की, जळगावातील भाजपाचे उमेदवार ठाकरे गटाच्या संपर्कात आहेत. रक्षा खडसे यांच्या विरूध्द त्यांच्या नणंदबाई प्रचारात उतरणार आहेत आशाही बातम्या येत आहेत. या सर्व रगाड्यात लोकांना निवडणूकच नकोशी वाटू लागली आहे.

गेल्या काही दिवसांपासून निवडणूक रोख्यांची चर्चा जोरात सुरू झाली तरी ज्या पक्षाला हजारो कोटी रूपये मिळाले त्या पक्षाचे पुढारी खूप लंगडे समर्थन करतात. तो मुद्दा निवडणूक प्रचारात गाजणार आहे. त्याचे दुष्परिणाम सत्ता पक्षाला भोगा–वे लागतील. म्हणूनही अंतर्गत गोंधळ उडवून दुसरीकडे लोकांचे लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. त्याचाही परिणाम आतापासूनच या निवडणुकीत दिसत आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तुरूंगात आहेत आणि केंद्र सरकारचा माफीचा साक्षीदार बाहेर आहे. केजरीवाल यांच्या विरूध्दचा पुरावा उपलब्ध नाही. तसाच तो सिसोदिया यांच्या विरूध्दचा देखील नाही. पण माफीच्या साक्षीदारांच्या विरूध्दचा भक्कम पुरावा उपलब्ध आहे. त्याने पंचावन्न कोटी रूपये सत्तापक्षाला दिले तेही उघड झाले आहे. हे संपूर्ण प्रकरण सत्ताधा–यांच्या अंगलट आले आहे. त्यामुळे झालेला गोंधळ लोकांच्या मस्तकात भिनला आहे. असे अनेक कंगोरे या निवडणुकीला आहेत. ते सगळे गोंधळाच्या आणि निरूत्साहाच्या मुद्यांशी निगडित आहेत. महाराष्ट्रातील युती व आघाडीत सगळा गोंधळच गोंधळ आहे. भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट, शिवसेना मुख्यमंत्री गट, इकडे शरदराव पवार गट, ठाकरे गट, काँग्रेस, वंचित आघाडी, अशा सर्व पक्षोपक्षांची मोट असल्याने व त्यांच्यातील तू तू मी मी ऐकायला मिळत असल्याने लोकांचे मनोरंजन होत आहे. शिवाय अनेकांना त्याचा उबगही येत आहे. ईतकी खिचडी असलेली आणि अशाश्वत अशी निवडणूक प्रथमच आपण बघतो आणि अनुभवतो आहोत. अजुनही आघाडीचा धुळे मतदार संघाचा उमेदवार ठरत नाही. जर माणूसच उपलब्ध नसेल तर खुशाल अन्य पक्षाकडे जागा सोपवून का देत नाही असे प्रश्न उपस्थित झालेले आहेत. शिवसेना ठाकरे गट ती जागा मागतो आहे. त्यावर फेरविचार होऊ शकतो. अशा चक्रव्यूहात हा मतदारसंघ अडकला आहे. भाजपचे देखील या मतदार संघात सारे काही आलबेल चालले आहे असे नाही. प्रचंड विरोध असल्याच्या बातम्या येत आहेत. जरी प्रचार, संपर्क सुरू असला तरी संभ्रमावस्था कायम आहे. या सर्व गोष्टींचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीत होणार आहे. उसनवारीतून पक्षात घेतलेल्या कार्यकर्त्यांचा काहीच भरवसा नसतो. ते कसे वागतील काय करतील याचाही भरवसा नाही. अशा बेभरवशाच्या व मानसिकतेच्या कार्यकर्त्यांच्या भरवशावर पक्ष आणि उमेदवार आहे. लोक ही सर्व घडामोड जवळून बघत असल्याने त्यांच्या मनात उदासीनता निर्माण झालेली दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणातील गोंधळात गोंधळ वंचित आघाडीने महा आघाडीत घातला आहे. ती चर्चा सध्या सोशल मीडियावर जोरावर आहे. वंचित आघाडीचे सर्वेसर्वा दर वेळी चर्चेत येतात. रोज नवी गुगली टाकतात. स्वत:चे स्वतंत्र उमेदवार जाहीर करतात. महा आघाडीत अवाजवी मागण्या करतात. पुरोगामीत्व सोडत नाहीत पण मदत सांकृतिक राष्ट्रवाद्यांना होईल अशीच त्यांची वागणूक असते असे आरोप सध्या त्यांच्यावर होत आहेत. त्यात यासाठी तथ्य वाटते की, गेल्या निवडणुकीत त्यांनी सत्ताधारी पक्षाला फायदा होईल अशी व्यूहरचना त्यांनी केली होती. आताही तसेच होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून त्यांचे समर्थक सोडले तर ईतर पक्षातील नेते कार्यकर्ते त्यांच्यावर भरवसा ठेवण्यास तयार नाहीत. असेही या निवडणुकीचे पदर आहेत. म्हणून एकूणच संभ्रमावस्था आणि निरूत्साह या निवडणुकीत आहे.



## अँग्लो-उर्दू हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक जमील अहमद यांचा सत्कार

**धुळे, दि.२– शहरातील अँग्लो–उर्दूहायस्कूलचेपर्यवेक्षक जमील अहमद मोहम्मद शबान हे ३१ मार्च २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. यानिमित्त अल्हाज जमीर अहमद मुल्ला सर फाउंडेशनच्या वतीने बाग–ए–जुबैदा, अल्लामा इक्बाल चौक मौलवीगंज येथे अल्हाज नेहाल अहमद जमीर अहमद मुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. मोहम्मद अनस अतिक अहमद यांनी पवित्र कुराण पठण करून सोहळ्याची सुरुवात केली.**

यावेळी अँग्लो–उर्दू हायस्कूलचे उपशिक्षक अब्दुल हफीज यांनी जमील सरांची अध्यापन सेवा, कर्मचाऱ्यांमध्ये असलेली लोकप्रियता अतिशय चांगल्या पद्धतीने मांडली. त्यांनी दीर्घकाळ चाललेल्या अध्यापन सेवांचा ही समावेश केला. फाउंडेशनने सत्कार केल्याबद्दल जमील सर यांनी अध्यक्ष व सदस्यांचे आभार मानले. यावेळी जमील सरांनी त्याच्या अध्यापन सेवा आणि त्याच्या खाजगी जीवनातील उतार–चढ़ाव उघड केले. यावेळी अतिक अहमद, अनीस अहमद, जफर मकसूद, अक्रम अन्सारी, निहाल मजहर सेठ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन इस्माईल शाद यांनी केले. हाजी अनीस अहमद यांनी आभार मानले.

## शिरपूरमधील आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. परिसंस्थेत जेंडर डायवर्सिटी कार्यशाळा संपन्न

**शिरपूर, दि.२– आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट शिरपूर व मुंबई येथील मेन अगेन्स्ट व्हायोलन्स ण्ड अब्युज (मावा) यांच्या संयुक्त विद्यमाने जेंडर डायवर्सिटी (लिंग विविधता) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा एस.एम. पटेल ऑडीटोरीयम हॉल येथे आयोजित करण्यात आली होती.**



हा कार्यक्रम प्रथम वर्ष बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. या कार्यशाळेत प्रमुख व्याख्याते मेन अगेन्स्ट व्हायोलन्स ण्ड अब्युज (मावा) संघटनेचे अमोल काळे व प्रवीण थोटे उपस्थित होते. अमोल काळे यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले, महिलांना असमानतेची मिळणारी वागणुक चिंतेचा विषय आहे. महिला–पुरुष समानतेच्या दृष्टीने लिंग संवेदनशीलता रुजवणे अत्यंत गरजेचे आहे. मुलींना लहानपणापासुन घरात असमानतेची वागणुक मिळते व त्यापासुन ही लिंग भेदवावस सुरुवात होते. आज लिंग समभाव व जागरुकता ही काळाची गरज झाली आहे. कित्येक वर्ष स्त्री झटते आहे, तिलाही सामाजिक स्तर, तिची ओळख निर्माण करायची आहे. त्यासाठी आपण सर्वांनी लिंग भेदभाव न करता स्त्रीयांना समान वागणुक दयावी. लिंग संवेदनशीलतेच्या बाबतीत जागरुकता निर्माण करण्याची आवश्यकता असुन समाजात ही असमानता दुर करण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयतक गरजेचे आहे. याबाबत चलचित्र व प्रेझेंटेशनद्वारे सखोल माहिती दिली.

कार्यशाळेचे आयोजन परिसंस्थेच्या संचालिका डॉ.वैशाली पाटील, उपसंचालक प्रा.मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ.तुषार पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा.सपना येशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.अमर गौर, डॉ.प्रियांका भंडारी, प्रा.केदार आपटे, डॉ.अमित पाटील, प्रा.तृप्ती चौधरी, सलमान पिंजारी यांनी संयोजन केले.

## आर.सी.पटेल आय.एम.आर.डी.चे बी.सी.ए.चे विद्यार्थी विद्यापीठात चमकले

**शिरपूर, दि.२– आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर.डी. परिसंस्थेतील बी.सी.ए. च्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय परिक्षेत उत्तुंग यश मिळवून गुणवत्ता यादीत स्थान पटकावले.**

बी.सी.ए. प्रथम वर्षामधून बडगुजर वैष्णवी संजय हिने १०.०० सीजीपीए व ८९.४३ टक्के गुण मिळवून विद्यापीठात प्रथम, पाटील गितेश्वरी राजेंद्र ९.८६ सीजीपीए व ९१.४३ टक्के विद्यापीठात द्वितीय, चौधरी कविता नयनराम ९.८६ सीजीपीए व ८८.८६ टक्के विद्यापीठात तृतीय स्थान मिळविले. द्वितीय वर्षामधून अहिरे वैभव राकेश याने ९.९५ सीजीपीए व ९१.२४ टक्के विद्यापीठात प्रथम, पाटील कामिनी छोटू ९.९ सीजीपीए व ८९.४३ टक्के विद्यापीठात द्वितीय, गिरासे तुषार जयसिंग ९.९ सीजीपीए व ८९.२४ टक्के विद्यापीठात तृतीय स्थान मिळविले. अंतिम वर्षामधून पाटील कल्याणी अरुण हिने ९.९७ सीजीपीए व ९२.३१ टक्के गुण मिळवून विद्यापीठात प्रथम, पाटील वैशाली राजेंद्र ९.९४ सीजीपीए व ९३.११ टक्के विद्यापीठात द्वितीय, पाटील निकिता नरेंद्र ९.९४ सीजीपीए व ९१.९७ टक्के विद्यापीठात तृतीय स्थान मिळविले. आय.एम. आर.डी. परिसंस्थेतील पदवी विभागातून बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थी विद्यापीठात प्रथम तीन क्रमाकाने उत्त्तीर्ण झाले आहेत.

या यशाबददल माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उद्योगपती चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरु डॉ.के.बी. पाटील, परिसंस्थेच्या संचालिका डॉ.वैशाली पाटील, प्रा.मनोज बेहेरे, डॉ.मनोज पटेल, डॉ. तुषार पटेल यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना प्रा.केदार आपटे, प्रा. महेश भावसार, डॉ.दगडू मराठे, प्रा.सचिन सुराणा, प्रा.अमर गौर, प्रा. दिनेश बोरसे, डॉ.प्रियंका भंडारी, प्रा.प्रियंका सैंदाणे, प्रा.सुफियान बागवान, प्रा.विजय गर्गे, प्रा.कौस्तुभ सावंत, प्रा.सुमित सगळे, प्रा.मोनाली किरंगे, डॉ.रुपाली अग्रवाल, प्रा. कीर्तिका बेहेरे, प्रा. विजेता सोनगिरे, प्रा.सुवर्णा चौधरी, प्रा.ज्योत्स्ना माळी, प्रा.मृणाल बिडकर, प्रा.तृप्ती चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

## परदेशात शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना मतदान करण्यासाठी प्रणाली विकसित करा : प्रा.पाटील

**शहादा, दि.२ (का.प्र.)– लोकसभा–२०२४ निवडणुकीसाठी परदेशात शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त करून देण्यासाठी योग्य प्रणाली विकसित करून मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विनंती पत्र मुख्य निवडणूक आयुक्तांना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा शहादा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रा.मकरंद पाटील यांनी पाठवले आहे.**



याबाबत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्तांसह पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री भारत सरकार यांना प्रा.मकरंद पाटील यांनी दिलेल्या लेखी पत्राचा आशय असा,परदेशात शिकत असलेल्या आमच्या भारतीय विद्यार्थ्यांच्या वतीने मी विनंती करतो की, या विद्यार्थ्यांना लोकसभा–२०२४ निवडणुकीत मतदानाचा हक्क वापरता यावा यासाठी एक अत्याधुनिक मतदान रचना विकसित करावी. माझ्या मतदार संघातील अनेक विद्यार्थी परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत आणि त्यापैकी काहींनी मला याबाबत योग्य तो पाठपुरावा करण्यास सांगितले आहे. हे विद्यार्थी मतदानासाठी भारतात येऊ शकत नसल्यामुळे आपल्या देशाला मतदानाची जास्तीत जास्त टक्केवारी गाठायची असेल तर या क्षेत्रातही प्रगती करणे आवश्यक आहे.तसेच परदेशातील विद्यार्थ्यांची मतेही महत्त्वाची आहेत. त्यांना भारताच्या संपर्कात राहून आणि भारतीय लोकशाहीबद्दल स्वारस्य व्यक्त करताना पाहून आ–पणा सर्वांना आनंद होणे स्वाभाविक आहे. अमृत कालच्या वर्षांमध्ये, आपल्या देशाची लोकशाही कायदेशीररित्या सर्वसमावेशक आहे याची खात्री करण्यासाठी परदेशात शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी एक अत्याधुनिक मतदान फ्रेमवर्क तयार करून मतदानाची टक्केवारी वाढावी. देशाच्या प्रगतीसाठी या संदर्भात आपल्या सकारात्मक प्रयतकांची अपेक्षा आहे असे प्रा.पाटील यांनी पाठवलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.



## भाजयुमोतर्फे नमो युवा चौपाल कार्यक्रम

**धुळे, दि.२– भारतीय जनता युवा मोर्चातर्फे नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी देशव्यापी नमो युवा चौपालचे आयोजन होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर धुळे लोकसभेचे खासदार डॉ.सुभाष भामरे व धुळे शहर विधानसभा प्रमुख अनुप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप यु.मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अ‍ॅड.रोहित चांदोडे यांनी धुळे विधानसभा वॉर रूम येथे आयोजन केले होते.**

भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आकाश परदेशी, माजी महापौर चंद्रकांत सोनार, माजी स्थायी समिती सभापती शितल नवले, उत्तर भारतीय प्रदेश उपाध्यक्ष महादेव परदेशी, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा मायादेवी परदेशी, बेटी बचाओ बेटी पढाओ प्रदेश सह.संयोजिका अल्पा अग्रवाल, ओबीसी महिला मोर्चा सरचिटणीस मोहिनीताई गौड, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष दिनेश बागुल, राकेश कुलेवार, सचिन पाटील व युवा पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विकासाबद्दल व त्यांच्या विकसित भारत संकल्पाबद्दल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजक रोहित चांदोडे यांनीही मनोगत व्यक्त केले. यापसंगी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

✻ जळगाव– भाजपाचे विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांना भाजपाने तिकीट नाकारल्याने नाराज झालेले पाटील हे बुधवारी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करणार आहेत. मात–ोश्री येथे उद्धव ठाकरे त्यांचे स्वागत करतील, अशी माहिती शिवसेनेत्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिली आहे.

## बाबुलाल पाटील

धुळे, दि.२– मुळ भिलाली ता.अमळनेर येथील रहिवासी, ह.मु.मयुर कॉलनी, देवपुर धुळे येथील बाबुलाल सदाशिव पाटील (सेवानिवृत्त बीडीओ) यांचे आज दि.२ वयाच्या ८५ वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. ते भिलाली येथील माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, एसएसव्हीपीएस कॉलेजचे अशोक पाटील, पारोळा येथील प्रा.मधुबाला सूर्यवंशी यांचे वडील होत.



## निधन वार्ता

## सुरेश पाटील

धुळे, दि.२– तालुक्यातील वरखेडे गावा–तील सामाजिक कार्यकर्ते सुनील सुरेश पाटील यांचे वडील सुरेश रामदास पाटील (वय ७०) यांचे आज दि.२ रोजी दुपारी अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवार दि.३ रोजी सकाळी १० वाजता वरखेडे येथील राहत्या घरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, सुना, मुले, जावई, नातवंडे असा परिवार आहे.















### शब्दकोडे क्रमांक.१८९८



**आडवे शब्द :** १.मनन ३.बाब ५.लायसन्स-मराठीत ८.मोहरी घातलेले एक प्रकारचे तोंडी लावणे १०.लोखंडी सळई ११.पाप १२.उत्सव १३.एका जागी न थांबणारा १६.बतराम-उलट लिहा १८.गवताची पेंढी १९.त्यासारखा २१.चोर २३.हिंदीत-जेव्हा २४.हिंदीत-भांडे २६.शिरा बनवण्यासाठी वापरतात २७.चहा पिण्याचे पात्र २९.सुकट,एक प्रकारची मच्छी ३२.कंडू ३२.डाळीत फोडणीला टाकतात ते पान ३३.एक मराठी ऋतू ३४.ताकद ३५.शिजवलेला तांदूळ ३६.आकाश ३९.वड ४०.परतफेड ४१.राजस्थानातील एक जगप्रसिदध पर्वत रांग ४३.चारपाई ४४.पाण्याने भरलेला माठ ४५.किंमत ४६.घाणेंद्रीय ४७.सुधारणा ४९.छान ५१.हिंदीत-आराम ५२.एखादयाशी असलेले घनिष्ट सबंध

**उभे शब्द :** १.एक आंबट फळ २.नीच पुरूष ३.जननी ४.बाधा ६.रसरशीत ८.साप ९.नरकाधिपती १२.हिंदीत-सर्व १३.पीठ मळण्याचे साधन १४.पिता १५.अष्ट १७.परग्रहावरील उडते यान १८.आपला देश २०.हाडांचा सांगाडा २२.नड २५.टक २८.एक फळ ३०.मुख ३१.वर-विरूदध ३२.लग्नात करा घेऊन मिरवणारी ३३.एक नक्षत्र वा शंभर तारकांचा समूह ३५.वजन ३७.धंदयातील तेजी ३८.जड,भरीव ४०.वस्त्र ४२.आशीर्वाद ४३.चपाती सारखा दिसणारा गुजराती खादय पदार्थ ४७.हाताचा अंगठा आणि करंगळी यांमधील अंतर ४८.मनातील बोच ५०.आपण स्वत:चा उल्लेख करताना वापरतो तो शब्द

### शब्दकोडे क्रमांक.१८९७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मा | क | ड | हा | ड | ■ | प | र | व | ड | ■ | मु |
| न | ट | ■ | ल | ■ | ग | ण | ती | ■ | बा | र | का |
| व | ■ | ना | त | ल | ग | ■ | ब | रा | ■ | सा | द |
| ता | र | का | ■ | मा | न | व | ■ | य | म | ■ | म |
| ■ | त्न | ■ | आ | ण | ■ | य | व | ■ | ती | स | ■ |
| को | ■ | सा | ज | ■ | स | मा | ग | म | ■ | म | ळ |
| प | रा | ग | ■ | सा | मा | न | ■ | य | मा | ई | ■ |
| रा | ज | ■ | स | म | ज | ■ | पा | त | क | ■ | फु |
| ■ | न | ड | ■ | ना | ■ | सा | रा | ■ | ड | ब | के |
| प | ■ | का | ठ | ■ | अ | व | य | व | ■ | ल | त |
| सा | ख | र | ■ | पा | ट | ■ | ण | ■ | ह | वा | ■ |
| रा | त | ■ | क | ल | क | ल | ■ | सी | ■ | न | वा |

# डायल ११२ प्रणालीव्दारे पिडीत व्यक्तीस तात्काळ मदत धुळे जिल्हा पोलीस दल राज्यात तिसरे, विभागात पहिले

**धुळे, दि.२– महाराष्ट्र एमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम अंतर्गत डायल–११२ या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करतांना पिडीत व्यक्तीला अवघ्या चार मिनिटाचे आत मदत पोहोचविल्याबद्दल धुळे जिल्ह्याने महाराष्ट्रात तिसऱ्या तर नाशिक परिक्षेत्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी डायल–११२ टिमचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.**



महाराष्ट्र एमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम (एमईआरएस) डायल ११२ या प्रकल्पाची अंमलबजावणी प्रभावीपणे होवून कॉलर (पीडीत) यास नजीकच्या एमडीटी धारकाने नेमुन दिलेल्या वेळेच्या आत मदत पोहोचविणे हे त्यांचे कर्तव्य असून त्याप्रमाणे कार्यवाही होणे कामी पोलीस अधीक्षक, धुळे कार्यालयाकडील आदेश यापुर्वी दिलेले आहे. धुळे जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन येथे डायल ११२ चे एकुण ३५ चारचाकी वाहन व ३४ दुचाकी वाहन व त्यावर एमडीटी टॅब बसविण्यात आले असुन सदर कार्यप्रणालीवर पोलीस अधीक्षक धुळे व अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे नियंत्रण आहे. धुळे जिल्हा डायल ११२ प्रणालीचा पिडीतास पोलीस मदत पोहोचविण्याचा रिस्पॉन्स टाइम जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात अनुक्रमे १५.५१ मिनिटे व १०.३५ मिनिटे होता. त्यामुळे एसपी धिवरे यांनी आढावा पिडीतास तात्काळ पोलीस मदत कशी पोहचेल याबाबत नियोजन करुन त्याची तंतोतंत अंमलबजावणी होणेकामी प्रभारी अधिकारी सपोनि विलास ताटीकोंडलवार यांना सुचना व मार्गदर्शन केल्याने माहे मार्च मध्ये पिडीतास पोलीस मदत पोचवण्याचा रिस्पॉन्स टाईम हा ३.५० मिनिट होवुन एवढ्या कमी वेळेत थेट पिडीतास तात्काळ मदत पोहचविणारा महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाचा जिल्हा म्हणून नामांकन प्राप्त झालेले आहे. सदरची कार्यवाही अधिक्षक धिवरे, अपर पोलीस अधी. काळे यांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली डायल ११२ कार्यप्रणालीचे प्रभारी अधिकारी, सपोनि विलास ताटिकोंडलवार, मे.महिन्द्रा डिफेन्सचे अभियंता योगेश कापडे, तुषार सोनवणे, डिस्पॅचर पोहेकॉ वाघ, पोहेकॉ खलाणे, पोहेकॉ निकुंभे, मपोहेकॉ भोई, पोना बोरसे, मपोकॉ शेंडगे, मपोकॉ चौधरी व सर्व पोस्टेचे प्रतिसादक यांचे योगदान आहे.




**हार्दिक अभिष्टचिंतन..!**

माता हिंगलाज चॅनेलचे संपादक, भावसार समाजाचे माजी अध्यक्ष व सुप्रसिद्ध

**राजुभाऊ फेटेवाले**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

राजेंद्र भावसार फेटेवाले

: शुभेच्छुक :

**दिलीप भावसार**

**भावसार टीव्ही सेंटर, धुळे**


## पाहिजेत

1) Marketing Manager-1
2) Marketing & Sales Executive - 3
3) Tale Caller - 1
4) Graphic Designer - 1
5) Electretion - 1

Add : F-51, Chaitanya Telecom, 1 st Floor, Garud Complex, opp.Kamalabai school, Sakri Road, Dhule

**Ph.9225606888**

## ड्रायव्हर पाहिजे

टाटा S साठी निर्व्यसनी, सकाळी लवकर येणारा ड्रायव्हर व मदतनिस पाहिजे.

-: संपर्क :-

**मुंदडा आईस डेपो**

मुंदडा मार्केट, पारोळारोड, धुळे

## गाळे विकणे आहेत

धुळे शहरात हिरे मंगल कार्यालयाच्या लगत असलेले गाळे ऑफिसेससाठी योग्य भावात विकणे आहेत.

-: संपर्क :-

**9422786568**
**8208332046**

## जागा विकणे आहेत

ग्रा.पं.कापडणे ता.जि.धुळे येथील गावातील मध्यवर्ती ठिकाणातील उपयुक्त सुमारे १५०० स्के.फूट बखळ जागा विकणे आहे.

-: संपर्क :-

**9422786568**

## बंगलो सिस्टीम फ्लॅट

तुळशीराम नगर, देवपूर येथे फर्स्ट फ्लोअर दोन रोड कॉर्नरचा प्रशस्त सुविधायुक्त इंटेरियरसह फ्लॅट विकणे आहे.

बिल्टअप एरिया : 1560 स्के.फूट

-: संपर्क :-

**7558706967**

## बंगलो विकणे आहे

तुळशीराम नगर, देवपूर येथे मोक्याच्या ठिकाणी 2 BHK इंटेरियरसह बंगलो विकणे आहे. प्लॉट एरिया- 1230 स्के.फूट, बिल्टअप एरिया- 834 स्के.फूट

-: संपर्क :-

**7558706967**

## घर भाड्याने देणे

स्वतंत्र ४ रुमचे घर भाड्याने देणे आहे. तसेच थर्मल थेरपी, मसाज बेड विकणे आहे.

**9850077453**

## पाहिजेत

इंटिरियर डिझाईनर–४
सेल्समन – ५
हेल्पर – ४

महिला–पुरुष दोघी चालेल.

आकाश हॅण्डलूम हाऊस जे.बी.रोड, धुळे

**7506000250**

## दुकाने विकणे आहेत

तुळशीराम नगर, देवपूर येथे दोन मेन रोड कॉर्नर, प्रशस्त पुर्वमुखी दोन दुकाने विकणे आहेत.

साईट- 241+241=482 स्के.फू.

-: संपर्क :-

**7558706967**

## रो बंगलो विकणे आहे

मोक्याच्या ठिकाणी सर्व सुविधायुक्त, स्वतंत्र पार्किंग, बोअरवेल, मनपा नळ, वीज मीटरसह 3 BHK बंगलो विकणे आहे.

साईट– अरुण नगर, वडेल रोड, देवपूर, धुळे

-: संपर्क :-

**7558706967**

## पाहिजेत

निवासी सहकुटुंब राहणारा वॉचमन पाहिजे. निवासाची सोय आहे. गरजूंनी अर्जासह भेटा. दि.४/४/२०२४ गुरुवार रोजी दुपारी ४.०० वाजता.

स्थळ : क्युमाईन विविध क्रिडा मंडळ, जेलरोड, धुळे

अध्यक्ष,

**क्युमाईन विविध क्रिडा मंडळ, धुळे**

## डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

दि.१ एप्रिल ते ६ एप्रिल २०२४ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.

–: संपर्क :–

**डॉ.गौतम शाह** M.S. (ऑर्थो)

शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे

फोन नं.०२५६२–२३५११३, भ्रमणध्वनी–०८६००३५१०००, ९८८१२७८६९८

## फ्लॅट विकणे आहे

2 BHK फ्लॅट विकणे आहे. श्री अपार्टमेंट, प्लॉट नं.३३, फ्लॅट नं.११, देवपूर, धुळे

-: संपर्क :-

**8669660897**
**9922551193**

## जागा भाड्याने देणे

बॅंकेस ग्राऊंड फ्लोअर २००० sq.ft. जागा भाडे तत्वावर देणे आहे (कमर्शियल ५०% बांधकाम)

**डॉ.नितीन काकडे**

६०, जयहिंद कॉलनी (मेनरोड), देवपूर, धुळे

(वास्तुचे बांधकाम सुरु आहे)

---

## पान १ वरुन

### शिंदेंकडे आढळली सोन्याची बिस्किटे

**तपासायचे असल्याने पाच दिवसांची पोलीस कोठडी मिळावी अशी मागणी केली होती. सरकारी वकील म्हणून ॲड. गणेश पाटील यांनी काम पाहिले.**

सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास दोंडाईचा येथील बस स्टॅंडजवळ असणाऱ्या जैन मंदिराच्या आवारात धुळे जिल्हा गुन्हा अन्वेषण विभागाचे दोन कर्मचारी अशोक पाटील व नितीन मोहने यांना दीड लाखाची लाच घेतल्यावर पकडण्यात आले. त्यांचे एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांच्याशी झालेल्या संभाषणाच्या आधारे लाच लुचपत विभागाचे पोलीस उपअधीक्षक अभिषेक पाटील यांनी एसपी ऑफिसमधील त्यांच्या कार्यालयात जावून चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात नेले व तपासी अंती त्यांनाही संशयित आरोपी करण्यात आले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एलसीबी पीआय दत्तात्रय शिंदे यांचे घराची झडती घेतली. यामध्ये त्यांच्या घरातून साठ लाखाचे सोने मिळून आले. यामध्ये सुमारे सहाशे ग्रॅमचे सोन्याचे बिस्किटे असून तिनशे ग्रॅमचे दागिने, कडे असे मिळून आले आहे. चांदीचे सत्त्याहत्तर हजाराच्या वड्या, दागिने, समई असे सापडले आहे. एक कोटी पंच्याहत्तर हजाराचे मालमत्ता खरेदीचे दस्त मिळून आले आहे. यामध्ये पार्टनरशीप फर्म दाखवून भागीदारीत घेतलेल्या मालमत्तांचे तसेच स्वत:च्या व पत्नीच्या नावे घेतलेल्या मालमत्तांचे दस्त व इतर कागदपत्रे आढळून आले आहेत. या प्रकरणी दोंडाईचा पोलीस स्टेशनला मंगळवार दि.२ एप्रिल रोजी भ.प्र.आधि.कलम ७.७ (अ) व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आज धुळे न्यायालयात न्यायमूर्ती श्री.डी.एम. आहेर साहेब यांच्या कोर्टात तिघांना हजर करण्यात आले होते. सरकारी वकील म्हणून ॲड.गणेश पाटील यांनी काम पाहिले. पो. उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळ्याचे अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.निरीक्षक श्रीमती रुपाली खांडवी यांनी रिमांड रिपोर्ट न्यायालयासमोर ठेवला. यामध्ये पाच दिवसाची पोलीस कोठडी मागण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला या प्रकरणातील संशयित आरोपींचे लॉकर्स कुठे कुठे आहे तसेच अजून काही मालमत्ता आहेत का याचा शोध घ्यायचा असल्याने तसेच मिळालेल्या दस्तांची जुळवणी करणे, इतर कोणाकोणाकडून लाच घेतली आहे याची तपासणी करणे, त्याचप्रमाणे आवाजाचे नमुने आदी तपास होणे गरजेचे असल्याने पोलीस कोठडीची मागणी करण्यात आली होती, असे सांगण्यात येते. न्यायमूर्ती श्री.डी.एम.आहेर साहेब यांनी संशयित आरोपीचे वकील, सरकारी वकील व तपासी अधिकारी श्रीमती रुपाली खांडवी यांचे म्हणणे ऐकल्यावर तिघा संशयित आरोपींना दोन दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

### नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

आहे. पालिकेवर प्रशासकराज असल्यामुळे नागरिकांना प्रभागातील स्थानिक लोकप्रतिनिधींकडे तक्रार करता येत नाही. नागरिकांनी नगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे वारंवार तोंडी तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात असल्याने आरोग्याच्या प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. पालिका मुख्याधिकारी तसेच तहसील व जिल्हा प्रशासनाने जनतेच्या आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी संबंधितांना कठोर आदेश द्यावेत अशी अपेक्षा शहरवासियांकडून व्यक्त केली जात आहे.

### रोकड लांबविणाऱ्या दोघांना अटक

तात्काळ तालुका पोलिसात लुटीप्रकरणी फिर्याद दिली. पो.नि.प्रमोद पाटील यांनी गुन्हा दाखल होताच दूरक्षेत्र आर्वी व अजनाळे बारी येथे नाकाबंदी केली. पथके तपासासाठी रवाना केली आणि काही तासातच फरार झालेल्या दोघांना कार व रोकडसह अटक केली. पोलिसांनी दोघांकडून कारसह ४ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अ.पो. अधीक्षक किशोर काळे, उ.वि.अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय प्रमोद पाटील, पोउनि महादेव गुट्टे, हेकॉ किशोर खैरनार, प्रविण पाटील, कुणाल पानपाटील, अविनाश गहिवड, पोना संतोष देवरे, मुकेश पवार, विशाल पाटील, सनी सांगळे, रवींद्र सोनवणे, कुणाल शिंगाणे, कांतिलाल शिरसाठ अशांनी बजावली आहे.

## पान १ वरुन

### खा.उन्मेष पाटील ठाकरे गटात जाणार!

उद्देशाने एनडीएतील पक्षांमधील नेत्यांनी पक्षांतर केले आहे. अशातच खासदार उन्मेष पाटील हे देखील शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश करणार आहे.

खा.पाटील ठाकरे गटात जाणार असल्याच्या वृत्तावर शिवसेनेच्या उपनेत्या आणि प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी शिक्कामोर्तब केले आहे. परंतु, पाटील यांना जळगावातून ठाकरे गटाच्या तिकीटावर लोकसभेची उमेदवारी मिळणार की नाही याबाबत अद्याप साशंकता आहे. सुषमा अंधारे यांनी काही वेळापूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, उद्या (३ एप्रिल) १२.३० वाजता जळगावचे विद्यमान खासदार उन्मेश पाटील यांचा शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर जाहीर पक्षप्रवेश होईल. खऱ्या शिवसेना परिवारात आपले मनःपूर्वक स्वागत.

### टंचाई निवारणासाठी नियंत्रण कक्ष स्थापन

वितरण कंपनी मधील अधिकारी यांचे गस्तीपथक नेमणेबाबत निर्देश दिले आहे. तसेच तालुकास्तरीय टंचाई निवारण समित्यांनी नियमित बैठका घेण्याचे निर्देश दिले आहेत.

जिल्ह्यात सद्यस्थितीत ५ शासकीय टॅंकर सुरु असून आहेत. परंतु भविष्यात टॅंकर लागण्याची शक्यता लक्षात घेवून खाजगी टॅंकरसाठी निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे. तसेच ज्या गावांमध्ये विहिरीचे अधिग्रहण करण्यात आले आहे व संभाव्य शक्यता आहे अशा गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत. असेही जिल्हाधिकारीगोयल यांनी कळविले आहे.

### अठरा लाखांचा अवैध दारुसाठा जप्त

बेडकी नाका येथे असलेल्या आंतरराज्य सिमा तपासणी नाकाबंदीचे ठिकाणी मध्यरात्री स्थानिक गुन्हे शाखा व नवापूर पोलीसांनी सापळा रचला असता एक पांढऱ्या रंगाचे अशोक लेलॅंड कंपनीचे चारचाकी वाहन त्यामध्ये टमाट्याने भरलेले प्लास्टीकचे कॅरेट व वांग्यांनी भरलेल्या प्लास्टीकच्या पिशव्या ठेवलेल्या दिसत असलेल्या वाहनास थांबवून तपासणी केली असता सदर वाहनामध्ये भाजीपाला असलेल्या कॅरेट व पिशव्यांचे खाली विदेशी दारुचे खोके लपवून अवैधरित्या गुजरात राज्यात चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने विनापरवाना वाहतूक करतांना मिळून आले. सदर वाहनावरील चालकास विश्वासात घेऊन अधिकची विचारपूस करता त्याने सदरचा माल हा त्याचे साथीदारांसह धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील कळंबिर गावाचे शिवारातील एका पडीक शेतातून भरुन एका पांढऱ्या रंगाच्या महिंद्रा बोलेरो वाहनातून अवैधरित्या विक्री करण्याचे उद्देशाने घेऊन जात असल्याचे सांगितले. त्याअन्वये नवापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे यांनी त्यांचे स्टाफसह व स्थानिक गुन्हे शाखेचे किरणकुमार खेडकर यांचे पथक अशांनी पकडण्यात आलेल्या आरोपीचे साथीदारांना लागलीच ताब्यात घेऊन साक्री तालुक्यातील कळंबीर गावाचे शिवारातील एका पडीक शेतातून सदरचा अवैध विदेशी दारुचा साठा कायदेशीर प्रक्रीया करुन जप्त केला व आरोपींना ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीतांकडुन एकुण १९६ खोके असा एकुण १८ लाख ३८ हजार ५६० रुपये किमतीची विदेशी दारु अवैधरित्या बाळगून त्याची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने घेऊन जात असतांना त्यांच्या मुसक्या आवळल्या. सदर आरोपींकडुन दारुची चोरटी वाहतूक करणेसाठी वापरण्यात आलेली वाहने देखील जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी महेंद्र उर्फ राहूल राजेंद्र मराठे वय २७ रा.उधना, गुजरात, सागर आबा भदाणे वय २४ रा.सुरत, गुजरात, हरिष गोविंदा देविकर वय २७ रा.सुरत, गुजरात, मोहनेश उर्फ गोकूळ प्रभाकर चित्ते वय ३२ रा.साक्री जि.धुळे, युवराज राजेंद्र जाधव वय ४३ रा.साक्री जि धुळे, राकेश तानाजी ठाकरे वय २९ रा.साक्री, सचिन सुनिल न्याहाळदे वय २४ रा.जैताणे ता.साक्रीअशांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., अपर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, नंदुरबार विभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार खेडकर, सहा. पोलीस निरीक्षक दिनेश भदाणे व स्थानिक गुन्हे शाखा व नवापूर पोलीस ठाण्याचे पथकाने केली आहे.

### बनावट मतदान कार्ड..

करण्यात येत होते ते संगणक व प्रिंटर तसेच सदर कामी वापरण्यात येणारा मोबाईल असे एकूण ३५ हजार रुपयाचे साहित्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी सुर्यकांत दत्तात्रय कोकणे रा.पाण्याचे टाकी जवळ, मोहाडी उपनगर धुळे, विनोद नामदेव गरुड रा.गायकवाड चौक यांच्याविरुध्द मोहाडी पो.स्टे. येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोसई प्रकाश पाटील, पोहेकॉ संदीप पाटील, सुरेश भालेराव, रविंद्र माळी, पोना रविकिरण राठोड, पोकॉ निलेश पोतदार, सुशिल शिंदे, गुणवंत पाटील अशांनी केलेली आहे.

### गरताड येथे शेतकऱ्याचे घर फोडले

पो.कॉन्स्टेबल गोरख मंगळे, चालक पो.हेडकॉन्स्टेबल जमीर पिंजारी,श्वान जय तसेच ठसे तज्ञ एपीआय व्ही.एम. खरात, एएसआय धनंजय मोरे, पो.ना.मनोज ब्राह्मणे, चालक पोलीस हेडकॉन्स्टेबल प्रकाश भावसार आदी ठसे तज्ञ देखील या ठिकाणी दाखल झाले होते. याबाबत मोहाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संपूर्ण गरताड परिसरात या चोरीमुळे एकच खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### आज दिक्षा कल्याणक महोत्सव

मध्येच वर्णिले नसून वैदिक साहित्यात देखील आढळते. आपल्या राज्यकाळात त्यांनी प्रजेला असी–मसी–कृषी–शिल्प–वाणिज्य– विद्या अशा उपजिविका साधनांचे विशेष रूपाने ज्ञान दिले. वृषभ देवांचा उल्लेख जैन व जैनेतर साहित्यात आदरपूर्वक केला आहे.

---

## प्लॉट विकणे आहे

शहराच्या मध्यवर्ती भागात, डी मार्टजवळ प्लॉट विकणे आहे.

-: संपर्क :-

**9175750613**

## पाहिजे

होलसेल मेडिकल दुकानासाठी

१) कॅम्प्युटर ऑपरेटर लेडीज : २ जागा
२) सेल्समन : २ जागा
३) हेल्पर : २ जागा

-: समक्ष भेटा :-

**श्रीसाई फार्मा**

गल्ली नं.५, धुळे

मो.नं.९४२२२९६२९६






## पाहिजेत

दुकान कामासाठी हुशार माणूस पाहिजेत.

सेल्समन – १
हेल्पर – २

**स्वर्ण पॅलेस ज्वेलर्स**

आग्रारोड, सराफ बाजार,धुळे

**02562-232428**
**233991**

## पाहिजेत

दुध डेअरीचा अनुभव असलेला माणूस लावणे आहे. तसेच दुध डेअरीवर दुधाचे फॅट काढू शकणारा अनुभवी माणूस लावणे आहे. समक्ष भेटा!

**महामाजी स्वीटस्**

ग.नं.४, खोलगल्ली, धुळे

**9822447729**

## जागा भाड्याने देणे आहे

फागणे बायपास हायवे टच २ ते ३ एकर जागा भाड्याने देणे आहे. चाळीसगाव हायवे टच दादावाडीच्या बाजुला ५०,००० स्के.फूट जागा भाड्याने देणे आहे.

-: संपर्क :-

**इंजि.हर्षल देसाई**

**9359407097**

## पाहिजे

हॉटेल इंडसीमध्ये मार्केटींग साठी फुलटाईम सेल्समन पाहिजे. पुरुष-१

कृपया अनुभव असलेल्या व्यक्तींनी संपर्क करावा.

**अक्षय निळे**

**9011495646**

## पाहिजेत

रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार व इतर सवलती दिली जाईल.

**ईश्वर गारमेन्टस्, धुळे**

**9423917461**

## पाहिजेत

नर्सिंग मुले

ANM / GNM - 3
Ambulance DRIVER - 3
Paramedics

-: संपर्क :-

**7588517991**

## पाहिजेत

झेरॉक्स मशीन कामासाठी शिकाऊ मुले/मुली पाहिजेत. फुलटाईम/पार्टटाईम

श्री विष्णू प्रिंटींग प्रेस ॲण्ड झेरॉक्स

डॉ.संजय देसलेंच्या दवाखान्या शेजारी, वाडीभोकर रोड, धुळे

**7709115682**
**9082420746**

## पाहिजेत

टाटा S साठी ड्रायव्हर

ॲपेरिक्षासाठी ड्रायव्हर

दुकान कामासाठी मुले

समक्ष भेटा!

**पूर्वा एजन्सीज**

गल्ली नं.३, बॉम्बे लॉजमागे, धुळे

## पाहिजे

प्लंबिंग इंडस्ट्रीमध्ये सेलिंग साठी सेल्समन पाहिजे. पुरुष-१, कृपया अनुभव असलेल्या व्यक्तींनीच संपर्क करावा.

**प्रितेश खंडेलवाल**

**8956998411**

## २० वर्षापासून ग्राहकांचा विश्वास असणारे श्री लॅण्ड डेव्हलपर्स घेऊन येत आहे..

**भक्ती नगर**

मासिक सुलभ हप्त्याने प्लॉट विक्री योजना

* योजनेची ठळक वैशिष्ट्ये *

* सदर प्लॉटस्‌ची योजना ही मुंबई आग्रा हायवेपासून अवघ्या २०० मिटर अंतराच्या आत धुळे एम.आय.डी.सी.समोर रानमळा रस्ता टच.
* प्लॉटची साईज : १२ X ६५ व ११ X ६५ व त्यापेक्षा मोठी साईज उपलब्ध.
* सदर योजनेची प्रवेश फी रु.५००/– असेल.
* एन.ए. व सनद झालेले प्लॉटस्.
* रोखीने व हप्त्याने खरेदीची सोय.
* वास्तुशास्त्राप्रमाणे डी मार्केटींग केलेले प्लॉटस्
* निसर्गरम्य वातावरणातील साईट.
* सर्वसामान्यांसाठी आपल्या बजेटमध्ये आपल्या पाल्यांसाठी चांगल्या गुंतवणुकीचा पर्याय.त्वरा करा!

–: संपर्क :–

श्री.सुभाष भगवान लोकरे श्री.स्वप्निल सुभाष लोकरे

ऑफिस :– २७०९, ग.नं.५, घड्याळवाली मस्जिद जवळ, धुळे

**9011765188, 9823412718, (02562) 240109**

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–४००४११५, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०